जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक १७.०५.२०२५**

''महिलांकडुन वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्या दलाल महिलेस अटक''

ठाणे शहराच्या ''राधा कृष्णा रेस्टॉरंट, पारो बार समोर, कल्याण-भिवंडी रोड, राजनोली गाव, ता. भिवंडी, जि. ठाणे'' येथे एक महिला दलाल काही पिडीत व असहाय्य महिलांकडुन वेश्याव्यवसाय करुन घेतात अशी गुप्त माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती चेतना चौधरी यांना मिळाली होती.

त्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर या शाखेने दिनांक १६/०५/२०२५ रोजी ''राधा कृष्णा रेस्टॉरंट, पारो बार समोर, कल्याण-भिवंडी रोड, राजनोली गाव, ता. भिवंडी, जि. ठाणे'' या ठिकाणी सापळा लावून महिला दलाल आरोपीस १५.५० वाजता चे सुमारास ताब्यात घेवुन तिच्या तावडीतुन ०१ अल्पवयीन मुलगी (वय १६ वर्ष ०९ महिने) व ०३ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदर आरोपीत महिले विरुध्द तसेच ०२ पाहिजे आरोपी यांचे विरुध्द कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नंबर । २७३/२०२५ भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ चे कलम ९६, ९८, १४३(१), १४३(३), ३(५) सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम १७, १८ सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच बळीत महीलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने शांतीसदन, महिलाचे सुधारगृह, उल्हासनगर ५ येथे ठेवण्यात आले आहे.

सदर कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे ठाणे तसेच श्री.धनाजी क्षिरसागर सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्रीमती चेतना चौधरी, मपोउपनिरी/स्नेहल शिंदे, पोउपनि/देवानंद चव्हाण, मपोउपनिरी/श्रध्दा कदम, पोहवा/व्ही.आर.पाटील, आर.यु.सुवारे, के.बी.पाटील, मपोअमं/ पी.जी.खरात, एच.आर.थोरात, चापोअंम/यु.एम.घाडगे यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

(किशोर खरात)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर